पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २०२**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०६/०१/२०२१** **वेळ – दु.०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **०६/०१/२०२१** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.अजित पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवार – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चारटणकर, मा.चितळे, मा.लोणकर – उप आयुक्त, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण) मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.मोरे, मा.पाटील, मा.पवार, मा.वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.बहुरे, मा.हराळे, मा.देशमुख, मा.पानसरे, मा.कोळप, मा.गावडे, मा.तायडे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरोंडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

---------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा शुक्रवार दिनांक ०८/०१/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २०२**

(सभावृत्तांत)

( दि.०६/०१/२०२१ दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – ०८/०१/२०२१** **वेळ – दु. ०२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०६/०१/२०२१ दुपारी २.३० वा. ची तहकूब** सभा शुक्रवार दिनांक **०८/०१/२०२१** रोजी **दु.०२.०० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.संतोष बबन कांबळे

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बोदडे – सहा.आयुक्त, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

---------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक १३/०१/२०२१ रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २०२**

(सभावृत्तांत)

( दि.०६/०१/२०२१ दु.२.३० व दि.०८/०१/२०११ दु.२.०० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – १३/०१/२०२१** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०८/०१/२०२१ दुपारी २.०० वा. ची तहकूब** सभा बुधवार दिनांक **१३/०१/२०२१** रोजी **दु.०२.१५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.अजित पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवार – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चारटणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.आगळे, मा.देशमुख – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पाटील – प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी,

मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशु वैद्यकिय अधिकारी, मा.बहुरे, मा.गावडे, मा.हराळे, मा.देशमुख, मा.पानसरे, मा.तायडे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी उपस्थित होते.

---------

**खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.शशिकांत कदम  अनुमोदक – मा.संतोष कांबळे

मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२०१) दि.३०/१२/२०२० दु.२.३० वा. झालेल्या सभेतील विषय क्र.४५ ठराव क्र.७९६३ दि.३०/१२/२०२० वगळून सदरचा सभावृत्तांत कायम करणेत यावा.

**सभापती** - मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२०१) दि.३०/१२/२०२० दु.२.३० वा. झालेल्या सभेतील विषय क्र.४५ ठराव क्र.७९६३ दि.३०/१२/२०२० वगळून सदरचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक – ७९६७  विषय क्रमांक – ०१

दिनांक – १३/०१/२०२१  विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे  अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३८५/२०२०, दि.१६/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि. 14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50) महानगरपालिका अधिनियम कलम 63 (6) व कलम 67 (3) (क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी विविध ठिकाणी देखरेखीखाली असणा-या (Institutional Quarantine) व Covid Care Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी र.रु.250/- प्रति दिन प्रति व्यक्ति (अक्षरी र.रु.दोनशे पन्नास फक्त) या प्रमाणे दि.11/05/2020 ते दि.16/07/2020 अखेर मे.टॅब किचन यांना अदा कराव्या लागणा-या र.रु 50,14,990/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख चौदा हजार नऊशे नव्वद फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.टॅब किचन, बाणेर रोड, पुणे 45 यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुण घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९६८ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/४३५/२०२०, दि.१४/१०/२०२०

विषय – आण्णासाहेब मगर स्टेडियम कोविड हॉस्पीटल येथील जेवण व नाष्टा यांचे बिल अदा करणेबाबत...

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९६९ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/३३४/२०२०, दि.२१/१०/२०२०

विषय - Covid 19 Jumbo Facilities Center उभारणेबाबतचा निधी मिळणेबाबत..

विषय क्रमांक ०३ चा विचार दिनांक २७/०१/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७० विषय क्रमांक – ०४
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – लेखा
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/०३/कावि/१७९/२०२०, दि.२१/१०/२०२०

विषय – कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर पीएमपीएमएल ला अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणेबाबत...

विषय क्रमांक ०४ चा विचार दिनांक २७/०१/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७१ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग–बांधकाम परवानगी व अनधिकृत
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.बाप/०१/कावि/२२४/२०२०, दि.०३/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.03/02/2020-2021 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अ, ब, क, ड, ई, फ, ग व ह या क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत अनधिकृत बांधकामावर व अतिक्रमणावर कारवाई करणेकामी विविध प्रकारची यंत्रसामुग्री पुरविणेकामी (२०२०-२०२१) मे.समीर एंटरप्रायजेस नि.र.रू.2,48,87,923/- (अक्षरी र.रु.दोन कोटी अठ्ठेचाळीस लाख

सत्त्याऐंशी हजार नऊशे तेवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,48,87,923/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,48,87,923/- पेक्षा 24.24% कमी म्हणजेच र.रु.1,88,55,090/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.1,88,55,090/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७९७२ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/४६८/२०२०, दि.०२/११/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि. 14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपा मार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना वमनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्र.10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे या पैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.17,36,100/- (अक्षरी र.रु. सतरा लाख छत्तीस हजार शंभर फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व पुरवठादार मे.हॉटेल राजवर्धन यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७३ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/४६९/२०२०, दि.०२/११/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपा मार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना वमनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्र.10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.78,57,000/- (अक्षरी र.रु. आठ्याहत्तर लाख सत्तावन्न हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व पुरवठादार मे.अन्नामृत फाउंडेशन यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७४ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.काशा/३/कावि/३९८/२०२०, दि.२१/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड मनपाकडील सर्व विभागाच्या वर्ग १ वर्ग २ चे अधिकारी यांना पिंपरी चिंचवड मनपामार्फत कार्यालयीन वापराकरिता कार व सुमो या प्रकारची वाहने दिली आहेत. सद्य स्थितीत मनपा कडे कार या प्रकारची ४८ वाहने आहेत व सुमो या प्रकारची ५० वाहने कार्यरत आहेत व सध्या मानधन घेतलेले वर्ग १ चे अधिकारी यांचेकरिता ०६ वाहने व देय अधिकारी यांचेकरिता ४ वाहने असे १० वाहने व मानधन घेतलेले वर्ग २ चे अधिकारी यांचेकरिता ०२ सुमो व १४ सुमो वाहने बंद असे १६ वाहनांची आवश्यकता आहे. मा.आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र.प्रशा/११/कावि/१७०/२०२० दि.३०/०३/२०२० अन्वये मनपाकडे वाहने उपलब्ध नसलेस नव्याने वाहने खरेदी न करता बाह्यस्त्रोताद्वारे भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करून घेणेबाबत धोरण निच्छित करणेत आले आहे. त्यानुसार वाहने भाडे तत्वावर घेणेकामी तीन वर्ष कालावधीकरीता एजन्सी निश्चित करणेकामी ई-निविदा नोटीस क्र. ३/२०२०-२०२१ वर्तमानपत्रामध्ये तसेच ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करुन दर मागविणेत आलेले असून सदरची निविदा दिनांक २८/१०/२०२० रोजी उघडणेत आलेली आहे.

१) कामाचे स्वरुपः-पिंपरी चिंचवड मनपाचे वापराकरिता भाडे तत्वावर वाहने घेणेबाबत.

२) निविदा र.रु.:- १,५२,४४,०५२/-

३) निविदा सुचना क्र. - ३/२०२०-२०२१

४) निविदा प्रसिद्धी दि. ०७/०८/२०२० ते दि.०३/०९/२०२०

५) जाहीरात प्रसिद्धी वर्तमानपत्राचे नाव – १)दै.पुण्यनगरी २) दै.बहुजनरत्न लोकनायक

३) दै.विश्वदर्पण ४) सा.माझी सखी सोबती

५) सा.जनप्रेम

६) निविदा उघडलेचा दि. – २८/१०/२०२०

७) प्राप्त निविदा – एकूण १२ निविदा प्राप्त त्यातील ७ पात्र ५ अपात्र

| | | | |
|---|---|---|---|
| १) मे.अक्षदा ट्रांसलिंक प्रा.लि | पात्र | ७) मे.श्री भैरवनाथ ट्रॅव्हल्स | पात्र |
| २) मे.इगल कार्स | अपात्र | ८) मे.श्रीपाद मल्टीप्रोडक्ट एलएलपी | अपात्र |
| ३)मे.एक्सीक्युटीव्ह कार रेंटल सर्व्हिसेस | पात्र | ९) मे.सोनाली टुर्स & ट्रॅव्हल्स | अपात्र |
| ४) मे.जे के टुरीस्ट & ट्रान्सपोर्ट | पात्र | १०) मे.सुष्टी टुर्स & ट्रॅव्हल्स | अपात्र |
| ५)मे.सहानी टुर्स & रेंटल्स | पात्र | ११) मे.स्वयंभु ट्रान्सपोर्ट | पात्र |
| ६)मे.एस ऐ ट्रॅव्हल्स | पात्र | १२) मे.विष्णुक्रुपा कामगार मोटार व वाहतुक सहकारी संस्था | अपात्र |

८) लघुत्तम निविदाधारक – सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे

१) अ.क्र १ ते १० करिता - मे.जे के टुरीस्ट & ट्रान्सपोर्ट

२) अ.क्र ११ ते १२ करिता - मे.स्वयंभु ट्रान्सपोर्ट

३) अ.क्र १३ करिता - मे.अक्षदा ट्रांसलिंक प्रा.लि

मनपाकरिता पुढील तीन वर्ष कालावधीकरिता भाडेतत्वावर वाहने घेण्याबाबत एजन्सी निश्चित करणेकामी निविदा सुचना क्र. ३/२०२०-२०२१ ई-टेंडरिंग द्वारे प्रसिद्ध करुन दर मागविणेत आले असून त्यामध्ये

१) अ.क्र १ ते १० करिता - मे.जे के टुरीस्ट & ट्रान्सपोर्ट

२) अ.क्र ११ ते १२ करिता - मे.स्वयंभु ट्रान्सपोर्ट

३) अ.क्र १३ करिता - मे.अक्षदा ट्रांसलिंक प्रा.लि

यांचे दर कमी असल्याने त्यांना इकडील दर कमी करणेबाबत पत्रव्यवहार करणेत आला आहे. एजन्सीने सादर केलेलेदराचा तक्ता सोबत सादर केला आहे.

प्रपत्र अ मधील दर तीन वर्षाकरिता स्वीकृत करून त्या दरानुसार वाहने भाडेतत्वावर घेणेचे काम हे लघुत्तम दर धारक एजन्सी कडून

अ.क्र १ ते १० करिता - मे.जे के टुरीस्ट & ट्रान्सपोर्ट र.रु.१,४२,४४,०५२/-

अ.क्र ११ ते १२ करिता - मे.स्वयंभु ट्रान्सपोर्ट र.रु.५,००,०००/-

अ.क्र १३ करिता - मे.अक्षदा ट्रांसलिंक प्रा.लि र.रु.५,००,०००/-

निविदा खर्च मर्यादेत (र.रु.१,५२,४४,०५२/-) करारनामा करुन घेणेस मान्यता देणेची मा.आति.आयुक्त(२) यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात चिफ केमिस्ट पद कार्यरत आहे. पाणीपुरवठा विभागातील जलशुध्दीकरण केंद्रामार्फत जलशुध्दीकरण प्रक्रीयेसोबत शहरातील नागरीकांना पुरविल्या जाणा-या पाणी नमुन्याची तपासणी करणेसोबत नागरिकांकडून येणा-या वेगवेगळया परिसरातील दुषित पाण्याच्या तक्रारी तपासणीचे कामकाज केले जाते. सदर तक्रारी प्राधान्याने तपासून त्याची माहिती संबंधित प्रभागातील पाणीपुरवठा विभागाकडे कळविण्यात

येते. जेणेकरुन दुषित पाण्यामुळे होणारे जलजन्य आजार रोखणेस मदत होते. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या पवना व इंद्रायणी नदीच्या पाण्याची गुणवत्ता वेळोवेळी तपासणी केली जाते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात चिफ केमिस्ट वर्ग १ चे पदावर एक अधिकारी कार्यरत आहे. सदर अधिकारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालय, दवाखाने, रुग्णालये, करसंकलन कार्यालये, माध्यमिक व प्राथमिक शाळा, नागरीकांकडील तक्रारी व नद्यांचे पाणी गुणवत्ता तपासणी यासारख्रे कार्यालयीन दैनंदिन स्वरुपाचे इतर कामकाजासाठी येणे-जाणे करिता एक वाहनाची आवश्यकता आहे. याप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्र चिफ केमिस्ट यांचेकरिता एक कार वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेस तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सीएसआर कक्षाचे कामकाज सुरु असून सदर कक्षामार्फत एक सीएसआर एक्सपर्ट व एक सीएसआर सहाय्यक सल्लागार यांची नेमणूक करणेत आलेली आहे. सीएसआर अंतर्गत महानगरपालिकेस अद्यापपर्यंत अंदाजे र.रु.२५ कोटी इतकी मदत प्राप्त झालेली आहे. सदरचे नेमणेत आलेले सीएसआर एक्सपर्ट व सीएसआर सहाय्यक सल्लागार यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील खाजगी कंपन्या, संस्था, लघुउद्योग व इतर व्यावसायिक संस्था या ठिकाणी जाणे-येणे करिता एक सुमो वाहनाची आवश्यकता आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये वर्ग १ चे पदावर ३ माहिती व तंत्रज्ञान अधिकारी कार्यरत आहेत. सदर अधिकारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालय, दवाखाने, रुग्णालये, करसंकलन कार्यालये, माध्यमिक व प्राथमिक शाळा, नागरी सुविधा केंद्रे व इतर संबंधित आस्थापना या ठिकाणी सॉफ्टवेअर, हार्डवेअर नेटवर्कीग, कनेक्टीव्हीटी इ. कामकाज व स्मार्ट सिटी अंतर्गत करणेत येत असलेल्या प्रकल्पांच्या संगणकीय कामकाजासाठी तसेच दैनंदिन स्वरुपाचे इतर कामकाजासाठी जाणे-येणे करिता प्रत्येक १ वाहन या प्रमाणे ३ कार वाहनांची आवश्यकता आहे. या प्रमाणे सीएसआर कक्षाकरिता १ सुमो वाहन व माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांचेकरिता ३ कार वाहने असे एकूण ४ वाहने भाडेतत्वार उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७५ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.उप आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१८४१/२०२०, दि.२२/१२/२०२०

मा.उप आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सद्याची अपवादात्मक व गंभीर परिस्थिती निर्माण झाली असल्याने “कोरोना“ आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता, त्याचा मुकाबला करण्याकरिता आवश्यक असणा-या अत्यावश्यक व तातडीची बाब म्हणुन भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व महापालिका अधिनियम कलम 63(6) मधील तरतुद विचारात घेता वरील संसर्गजंन्य रोग नियंत्रणात आणणेसाठी, प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असलेने महानगरपालिकेच्या हद्दीतील कोरोना विषाणूचा होत असलेला

प्रसार रोखणे बाबतच्या उपाय योजनांसाठी 60 वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना त्यांची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी B-Complex with zinc Capsule खरेदी करणेकामी अल्पमुदतीची ई.नि.सु.क्र.5/2020-21 अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ऑस्टिन हेल्थकेअर, हडपसर, पुणे यांचेकडुन प्राप्त झालेला निविदा लघुत्तम दर र.रु.0.848 प्रती Capsule स्विकृत करण्यात आलेला असुन त्यानुसार 15,00,000 नग खरेदी करीता करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. Capsule खरेदी करणेकामी एकूण र.रु.12,72,000 + GST इतका खर्च होणार असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७६ | विषय क्रमांक – १०
दिनांक – १३/०१/२०२१ | विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.आरती चोंधे | अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/५१४/२०२०, दि.२२/१२/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.32/9/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१६ मधील रावेत व किवळे भागातील स्मशानभुमी मधील दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवकुमार कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.44,94,221/- (अक्षरी र.रु. चव्वेचाळीस लाख चौ-याण्णव हजार दोनशे एकवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,64,221/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,64,221/- पेक्षा 38.99% कमी म्हणजेच र.रु.27,23,621/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.20,347/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.30,000/- = एकुण र.रु.27,73,968/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७७ | विषय क्रमांक – ११
दिनांक – १३/०१/२०२१ | विभाग – वायसीएमएच
सुचक – मा.भिमाबाई फुगे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/फार्मा/स्टो/कावि/१८४/२०२०, दि.२४/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे वाय.सी.एम.रूग्णालयासह सर्व दवाखाने/ रूग्णालये यांना आवश्यक औषधे/साहित्य मध्यवर्ती भांडार विभागामार्फत खरेदी करून पुरविली जातात.परंतु काही अपवादात्मक

परिस्थितीत काही औषधे/साहित्याचा पुरवठा मध्यवर्ती भांडार विभागाकडुन न झालेस रूग्णालयीन सेवेत अडथळा होऊ नये म्हणुन अशा तातडीने लागणा-या औषधे/ साहित्याचे खरेदीसाठी,वाय.सी.एम.रूग्णालया मार्फत ई.निविदा क्र.१/२०१९-२० वायसीएम औषध भांडार अन्वये निवीदा प्रसिद्ध करणेत येऊन, ब्रँडेड औषधांचे M.R.P. वर १५.५०% सुट, जेनेरीक औषधांचे M.R.P. वर ५६.७०% सुट व सर्जीकल साहित्याचे M.R.P. वर ५४.००% सुट या दराने मे.कोठारी मेडीकल, संत तुकाराम नगर, पिंपरी, मे.रूबी अलकेअर सर्वीसेस प्रा.लि., वाय.सी.एम.हॉस्पीटल, पिंपरी, व मे.ओमनी हेल्थकेअर, सिटी केअर फार्मसी, पिंपरी ह्या तीन एजन्सीस दरकरारा नुसार खरेदीकामी, निश्चित करणेत आल्या आहेत, त्याकरीताचे र.रू.एक कोटीचे अंदाजीत खर्चास मा.स्थायी समिती सभा यांचेकडील ठराव क्र.६६३४ दि.०५/०२/२०२० अन्वये सदर पुरवठाधारकांना दोन वर्षे कालावधी करिता पुरवठा आदेश निर्गत करणेस व त्या अनुषंगाने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता दिलेली आहे, त्यानुसार उपरोक्त नमुद निवीदाधारकांनी निवीदेद्वारे निश्चित केलेल्या दराने तातडीक औषधे/साहित्याचा पुरवठा करणेकामी करारनामा करुन दिला असलेने निवीदाधारकांना, दोन वर्षे कालावधीसाठी आदेश क्र. वायसीएमएच/फार्मा/स्टो /कावि/५०/२०२०, दि.०१/०४/२०२० अन्वये पुरवठा आदेश निर्गत करणेत आला आहे. कोरोना व्हायरस मुळे उद्भवणा-या कोवीड-१९ या साथीच्या आजाराचे रूग्णांवर उपचार करणेकामी वाय.सी.एम रूग्णालयासह म.न.पा.चे ईतर रूग्णालयांतर्गत विलगीकरण कक्षसुरू करणेत आले असुन, तसेच म.न.पा.तर्फे ऑटोक्लस्टर व अण्णासाहेब स्टेडियम येथे कोवीड-१९ जम्बो हॉस्पीटल सुरू करणेत आले असुन या सर्व विभागांमद्ये दाखल कोवीड-१९ रूग्णांवर उपचार करणेकामी, आवश्यक औषधे/साहित्याचा पुरवठा मध्यवर्ती औषध भांडाराकडुन करणेत येत असुन, कोवीड-१९ या आजारावर उपचार करणेकरिता आवश्यक काही औषधे/साहित्ये मध्यवर्ती भांडारा कडील औषधे/ साहित्ये खरेदी निवीदेत समाविष्ठ नसलेमुळे, तसेच लॉकडाऊन मुळे मध्यवर्ती भांडाराकडील पुरवठाधारकांकडुन औषधे/ साहित्याचा मागणीनुसार पुरेशा प्रमाणात पुरवठा होत नसलेमुळे रूग्ण सेवेत अडथळा निर्माण होऊ नये या करिताकोवीड-१९ चे रूग्णांवर उपचार करणे करिता आवश्यक औषध/साहित्य उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त असलने, अशी तातडीने आवश्यक औषधे/साहित्ये माहे एप्रील २०२० पासुन तातडीने आवश्यक औषधे/साहित्ये खरेदी निवीदे अन्वये नेमणुक केलेल्या पुरवठाधारकांकडुन उपलब्ध करुन देणेत येत असुन, विभागांचे मागणीनुसार आवश्यक्ते प्रमाणे पुरवठाधारकांना औषधे/साहित्याचा पुरवठा करणेकामी, वेळोवेळी पुरवठा आदेश निर्गत करणेत आले आहेत. निवीदेची मान्य रक्कम रूपये एक कोटी मधुन निविदाधारकांनी पुरवठा केलेल्या औषधे / साहित्यांचे माहे जुलै २०२० पर्यंतचे बिलांची अदायगी करणेत आली असुन,याकामी र.रू.९९,४३,५०९/- खर्ची पडले आहेत, माहे ऑगस्ट २०२० ते नोव्हेबर २०२०आखेर पर्यंत निवीदीधारकांना निर्गत केलेल्या पुरवठा आदेशांनुसार मे.कोठारी मेडीकल यांना अंदाजे र.रू.१,२३,६९,८४०/- मे.रूबी अलकेअर सर्वीसेस प्रा.लि.यांना र.रू.७४,७५,११४/- व मे.ओमनी हेल्थकेअर यांना र.रू.१,१०,००,०००/- एकुण र.रू.३,०८,४४,९५४/- या रकमेच्या बिलांची अदायगी होणे बाकी आहे, निवीदा क्र.१/२०१९-२० वायसीएम औषध भांडार,या निवीदेची मुदत ३१/०३/२०२२ पर्यंत असलेने या निवीदे अन्वये मान्य खर्चामध्ये अंदाजे र.रू.३,५०,००,०००/- (अक्षरी रक्कम तीन कोटी पन्नास लाख फक्त) इतकी वाढ अपेक्षीत असलेने सदर वाढीव खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. कोरोना या संसर्गजन्य रोगामुळे, अचानक उद्भवलेल्या परिस्थीतीत कोवीड-१९ आजारग्रस्त रुग्णांवर उपचार करणेसाठी तातडीने औषधे खरेदी करावी लागल्याने,भारतीय साथरोग अधिनियम १८९७,सार्वजनिक आरोग्य विभाग,अधिसुचना दि.१३/०३/२०२०, आपत्ती व्यवस्थापन

कायदा कलम ४१ व ५०,महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६),कलम ६७(३)(क) नुसार वरिल प्रमाणे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७८ | विषय क्रमांक – १२

दिनांक – १३/०१/२०२१ | विभाग – जशुके से.क्र.२३ पाणीपुरवठा

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/१८९/२०२०, दि.२२/१२/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

जलशुध्दीकरण केंद्र से.क्र.२३ येथील यंत्रणा संपूर्ण शहरास पाणीपुरवठाकरण्यासाठी २४ तास कार्यरत असते. जलशुध्दीकरण केंद्र मधील परिसराची व्याप्ती खूप जास्त असून या ठिकाणी परिसरातील साफसफाई व तेसच कार्यालयासह इतर युनिट्सची साफ सफाई करण्यासाठी उपरोक्त विषयांकित काम आदेश क्र.पापु/०६/कावि/३१०/२०१८, दिनांक १३/१२/२०१८ अन्वये मे.युनिक ट्रेडर्स यांना देणेत आले असून काम सुरु आहे. सदरच्या कामाची निविदा र.रु.२७,५२,४७७/- इतकी असून कामाची मुदत २४ महिने आहे. सध्यस्थितीत सदरच्या कामाची मुदत दिनांक १२/१२/२०२० रोजी पुर्ण होत आहे. जलशुध्दीकरण केंद्र येथील साफ सफाई करण्याच्या कामासाठी विभागाने नव्याने अंदाजपत्रक तयार केले असून निविदा कार्यवाहीकामी पुढील प्रक्रिया सुरु आहे. परंतु दरम्यान च्या काळात आचारसंहिता लागू झाल्या कारणाने निविदा प्रसिध्द करणे शक्य झालेले नाही. तसेच निविदा प्रसिध्दी नंतर कामाचा आदेश होण्यास लागणार कालावधी विचारात घेता असे लक्षात येते की मधील बराच कालावधी जशुके च्या परिसरातील साफ सफाई करण्यासाठी अडथळा निर्माण होणेची शक्यता नाकारता येत नाही. सध्यस्थितीत चालू कामाची मुदत दि. १२/१२/२०२० रोजी पूर्ण होत असून नवीन कामाची निविदा प्रक्रिया सुरु असलेने, तूर्तास सदरच्या चालू कामास ३ महिने (१२/०३/२०२१) पर्यंत मुदत वाढ देऊन विषयांकित कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास येणा-या वाढीव खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेऊन काम करुन घेणे योग्य राहील असे मत आहे. तसेच मुदतवाढ कालावधी दरम्यान येणा-या वाढीव खर्चाच्या रकमेची तरतुद विभागामार्फत मनपाच्या सन २०२०-२१ च्या सुधारित व सन २०२१-२२ च्या मूळ अंदाजपत्रकात करणे शक्य आहे. या अनुषंगाने विभागाने ३ महिने मुदतवाढीसाठी सदरच्या -“जलशुध्दीकरण केंद्र से.२३ मधील विविध युनिट्सची यांत्रिक पध्दतीने साफ सफाई करणे”कामाचे र.रु. ३०,३४,६०५/- चे सुधारित अंदाजपत्रक तयार केले असून त्यास तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सध्यस्थितीत जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारातील व तेसच विविध युनिट्स मधील साफ सफाईच्या कामास कुठलाही खंड पडू नये या दृष्टीने मे.युनिक ट्रेडर्स यांच्या चालू कामास ३ महिने मुदतवाढ देऊन विषयांकित कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देऊन त्या कालावधी दरम्यान येणा-या वाढीव खर्चाच्या र.रु.३,३८,०००/- (सुधारित निविदा र.रु.३०,३४,६०५– मूळ निविदा र.रु.२६,९७,४२७ = र.रु.३,३७,१७८/-) रकमेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९७९ विषय क्रमांक – १३
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य PMAY प्रकल्प
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/ PMAYप्र/६७५/२०२०, दि.१८/१२/२०२०

विषय - प्रधानंमत्री आवास योजनेअंतर्गत शहरामध्ये सर्वांसाठी घरे योजना राबविणेकामी शहरस्तरिय तांत्रिक कक्ष City Level Technical Cell (CLTC) चे कामकाजाबाबत...

विषय क्र.१३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९८० विषय क्रमांक – १४
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/४५९/२०२०, दि.१८/१२/२०२०

विषय – तरतूद वर्गीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक १४ चा विचार दिनांक २७/०१/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८१ विषय क्रमांक – १५
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय, जलनि:सारण
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/जनि/कावि/१३०/२०२०, दि.२३/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड मनपाच्या ब व फ प्रभागातील जलनि:सारण नलिकांची व चेंबर्सची साफसफाई करणे व चोकअप काढणेची कामे वार्षिक ठेकेदारी पध्दतीने करणेत येत आहेत. सदर कामांच्या निविदा अटी शर्तीमध्ये निविदेचा कालावधी हा ५ वर्ष आहे. तसेच कामाचा आदेश १ वर्षासाठी दयावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल असे नमुद करणेत आले आहे. सद्या चालू असलेल्या कामांची एकुण ५ वर्षे कालावधीची मुदत संपलेली आहे. तथापि, कोरोना विषाणूच्या संसर्गाने उद्भवलेल्या आपत्तीमुळे नव्याने निविदा कार्यवाहीकरीता विलंब झालेला आहे. तसेच मा. आयुक्त साहेब यांचेकडील दिनांक ११/०५/२०२० रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार ब व फ प्रभागातील कामांस निविदा स्विकृत दरापेक्षा अनुक्रमे २५.००% जास्त व १९.३५ % जास्त दराने नविन निविदा कार्यवाही होईपर्यंतच मुदतवाढ देणेबाबत आदेश आहेत. तथापि, मा. स्थायी समितीने ठराव क्र. ७१६० दिनांक १७/०६/२०२० व ठराव क्र. ७२५०, दिनांक १५/०७/२०२० अन्वये सदर कामांस ६ महिने अथवा नव्याने निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत

मुदतवाढ देणेस मान्यता दिलेली आहे. त्यामुळे मा.स्थायी समितीने ठरावात नमुद केलेली ब व फ प्रभागाची ६ महिने कालावधीची मुदत अनुक्रमे दिनांक २३/१२/२०२० व दिनांक ११/१२/२०२० रोजी संपत आहे. तथापि, अद्यापपर्यंत "ब व फ प्रभागातील जलनि:सारण नलिका व चेंबर्सची साफसफाई करणे व चोक अप काढणे"चे नविन निविदा काम सुरु झालेले नाही. सद्यस्थितीत विषयांकित कामांची नविन निविदा कार्यवाही सुरु असुन निविदा नोटिस प्रसिद्ध करणेत आलेली आहे. निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक १६/१२/२०२० पर्यंत आहे. त्यामुळे सदर कामांची निविदा कार्यवाही होऊन नव्याने कामाचा आदेश देणेकरीता आणखी कालावधी लागणार आहे, तसेच सदरचे काम अत्यावश्यक सेवेचे असल्याने मनपामार्फत अखंडीत सुरु ठेवणे गरजेचे आहे. तरी उपरोक्त बाबींचा विचार करता 'ब'व 'फ'प्रभागातील विषयांकीत कामांस निविदा स्विकृत दरापेक्षा अनुक्रमे २५.००% जास्त व १९.३५% जास्त दराने३१ मार्च २०२१ पर्यंत अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर येईल तोपर्यंत मुदतवाढ देऊन येणारा खर्च अनुक्रमे रक्कम रुपये ३४,३६,५१०/- व र.रू.३६,५७,६५२/- पर्यंत काम करुन घेणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयामध्ये निविदाधारकांचे नाव व निविदा क्रमांक नमुद करणेत आलेले नाही. जलनि:सारण विभागाकडील सदरच्या विषयांमध्ये निविदा क्र.12/4/2014-15 कामाचे नाव-"पिंपरी चिंचवड मनपाचे ब. प्रभागातील जलनिःसारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोक अप काढणे" मे.विशाल सिव्हील कॉंट्रॅक्टर व निविदा क्र.12/6/2014-15 कामाचे नाव-फ क्षेत्रिय कार्यालयातील मनपाच्या "फ क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. "मे.सुरज कॉंट्रॅक्टर यांचे कामांस निविदा स्विकृत दरापेक्षा अनुक्रमे २५.००% जास्त व १९.३५ % जास्त दराने ३१ मार्च २०२१ पर्यंत अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर येईल तोपर्यंत मुदतवाढ देऊन येणारा खर्च अनुक्रमे रक्कम रुपये ३४,३६,५१०/- व ३६,५७,६५२/- पर्यंत काम करुन घेणे याप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८२ विषय क्रमांक – १६
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/१७१/२०२०, दि.२८/१२/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.22/14/2020-21 अन्वये प्रभाग क्रं.१५ मधील स्वच्छतागृहांची दुरूस्तीची कामे करणेकामी (सन २०२०-२१ साठी) M/s.YASH ENTERPRISES नि.र.रू.33,89,629/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख एकोणनव्वद हजार सहाशे एकोणतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.33,62,579/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.33,62,579/- पेक्षा 33.99% कमी म्हणजेच र.रु.22,19,638/- + रॉयल्टी

चार्जेस र.रु.6,813/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.27,050/- = एकुण र.रु.22,53,501/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८३ विषय क्रमांक – १७

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/८८०/२०२०, दि.२८/१२/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.6/36/2020-21 अन्वये प्रभाग क्र.31 मधील परिसरात वार्षिक ठेकेदारी पद्धतीने समतानगर, गणेशनगर, कवडेनगर, स्वामी विवेकानंद नगर व उर्वरीत भागामध्ये ड्रेनेज लाईनची व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.त्रिशुल एंटरप्रायजेस नि.र.रू.29,85,673/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख पंच्याऐंशी हाजर सहाशे ञ्याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,85,673/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,85,673/- पेक्षा 30.8% कमी म्हणजेच र.रु.20,66,086/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.14,267/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.20,80,353/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८४ विषय क्रमांक – १८

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/८८१/२०२०, दि.२८/१२/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.6/40/2020-21 अन्वये प्रभाग क्र.20 मधील कासारवाडी, कुंदननगर, विशाल थिएटर परिसर, वल्लभनगर, लांडेवाडी व उर्वरीत परिसरात वार्षिक ठेकेदारी पद्धतीने ड्रेनेज लाईनची व चेंबरची देखभाल दुरुस्तीकरणेकामी मे.आदित्य कनस्ट्रक्शन नि.र.रू.44,76,209/-

(अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख शहात्तर हजार दोनशे नऊ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,76,209/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,76,209/- पेक्षा 34.01% कमी म्हणजेच र.रु.29,53,850/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.23,770/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.29,77,620/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७९८५ विषय क्रमांक – १९

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/५३९/२०२०, दि.२८/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.26-01/2019-2020 अन्वये प्रभाग क्र. 21 पिंपरी मधील मनपाचे विविध इमारतीवर सोलर सिस्टीम बसविणेकामी (फेरनिविदा) मे.एच एन्ड पी इन्फ्राटेक एल एल पी निविदा र.रु.64,85,144/- (अक्षरी र.रु.चौसष्ट लाख पंच्याऐंशी हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा -14.14% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८६ विषय क्रमांक – २०

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – नागरवस्ता विकास योजना

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०४/कावि/६७२/२०२०, दि.२९/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मनपा हददीतील दिव्यांग व्यक्तींकरीता विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविणेत येतात. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी दिव्यांग कल्याणकारी योजना या उपलेखाशिर्षावर एकूण २१ उपयोजना असून सदर एकत्रित उपलेखाशिर्षासाठी एकुण र.रु.२७,१६,००,०००/- (अक्षरी र.रु.सत्तावीस कोटी सोळा लाख फक्त) इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी "उपलेखाशिर्ष क्र.६ "मनपा हद्दीतील कुष्ठपिडीत व्यक्तींना सहामाही/वार्षिक अर्थसहाय्य देणे" या उपलेखाशिर्षावर र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) इतकी तरतूद करणेत आली असून आज अखेर सदर उपलेखाशिर्षावर र.रू.३९,६०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणचाळीस लाख साठ हजार फक्त) इतका खर्च झाला आहे. सद्य

स्थितीत कोविड-१९ या आजारामुळे शासनाचे निर्देशानुसार दिव्यांग व्यक्तींना दिला जाणारा सहामाही/वार्षिक पेन्शनचा लाभ हा प्रति माह देण्यात येत आहे. त्यामुळे एकुण २२२ पात्र लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी प्रति माह र.रु.२५००/- प्रमाणे एकुण र.रू.५,५५,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख पंच्चावन्न हजार फक्त) इतके अर्थसहाय्य देण्यात येत आहे. आज अखेर सदर योजनेवर र.रू.४०,०००/- इतकी तरतुद शिल्लक असुन मार्च २०२१ पर्यंत पेन्शन योजनेसाठी र.रू.१६,६५,०००/- इतका खर्च होणार आहे. त्यापैकी शिल्लक तरतुदी व्यतिरिक्त र.रू.१६,२५,०००/- इतकी खर्चासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात, लेखाशिर्ष दिव्यांग कल्याणकारी योजना या मुख्य लेखाशिर्षांतर्गत उपलेखाशिर्ष क्र.६ "मनपा हद्दीतील कुष्ठपिडीत व्यक्तींना सहामाही/वार्षिक अर्थसहाय्य देणे" या उपलेखाशिर्षावर र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) इतकी तरतूद करणेत आली आहे. आज अखेर सदर उपलेखाशिर्षावर र.रू.४०,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस हजार फक्त) इतकी तरतूद शिल्लक असून इतर उपलेखाशिर्षावरुन र.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रु.वीस लाख फक्त) वर्ग करणे आवश्यक आहे. सदर उपयोजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ अदा करणेकामी वाढीव रक्कम वर्ग करणे आवश्यक आहे. त्यानुसार दिव्यांग कल्याणकारी योजना या मुख्य लेखाशिर्षांतर्गत सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात उपलेखाशिर्ष क्र.०२- "नि.समर्थ (दिव्यांग)व्यक्तींना चलन-वलन साधने वाटप अर्थसहाय्य "या उपलेखाशिर्षावरील उपलब्ध रकमेतून र.रू.२०,००,०००/-(अक्षरी र.रु.वीस लाख फक्त), वर्ग करणे योग्य होईल.

| लेखाशिर्षाचे नाव | अ.क्र | उपलेखाशिर्षाचे नाव व क्रमांक | सन २०२०-२१ ची तरतूद | आवश्यक तरतूद वाढ करावयाची रक्कम | आवश्यक तरतूद घट करावयाची रक्कम | सुधारीत तरतूद सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|
| **दिव्यांग कल्याणकारी योजना र.रू.२७,१६,००,०००** | १ | उपलेखाशिर्ष क्र.२ "नि.समर्थ (दिव्यांग) व्यक्तींना चलन-वलन साधने वाटप अर्थसहाय्य " | ४०,००,०००/- | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| | २ | उपलेखाशिर्ष क्र.२"मनपा हद्दीतील कुष्ठपिडीत व्यक्तींना सहामाही/वार्षिक अर्थसहाय्य देणे" | ४०,००,०००/- | २०,००,०००/- | | ६०,००,०००/- |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेनुसार सन २०२०-२१ मधील उपलेखाशिर्षामध्ये वाढ / घट करणे आवश्यक असून सदरचे वर्गीकरण हे विभागाअंतर्गत वर्गीकरण असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८७ विषय क्रमांक – २१

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/१८८/२०२०, दि.१०/११/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगररचना व विकास विभागाकडील पत्र क्र.नरवि/कावि/९/१५६/२०२० दि.०८/१०/२०२० अन्वये मौजे वाकड येथील सर्व्हे नं.१६९ पै, १७० पै. व १७२ पै. मधील आरक्षण क्र.४/२३ (माध्यमिक शाळा) या आरक्षणाच्या जागेची अतितातडी मोजणी करुन मिळणेसाठी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, मुळशी (पौड) यांना कळविलेले आहे. त्यास अनुसरुन संदर्भिय पत्र क्र ३ अन्वये उपअधिक्षक, भुमी अभिलेख, मुळशी (पौड) यांनी मौजे वाकड येथील सर्व्हे नं. १६९ पै, १७० व १७२ पै. मधील आरक्षण क्र. ४/२३ (माध्यमिक शाळा) या आरक्षणाच्या जागेची अतितातडी मोजणी करणेकामी शासकीय मोजणी फी र.रु.१,८६,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख शहाऐंशी हजार फक्त) इतकी रक्कम चलनाने भरणा करावी असे कळविलेले आहे. त्यामुळे उपअधिक्षक, भुमी अभिलेख, मुळशी (पौड) यांनी कळविलेली अति तातडी मोजणी फी र.रु.१,८६,०००/- भरणेकामी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, मुळशी (पौड) यांना तात्काळ अदा करणे आवश्यक असल्याने सदरची अति तातडी मोजणी फी र.रु.१,८६,०००/- रक्कम उपअधिक्षक, भुमी अभिलेख, मुळशी (पौड) यांना अदा करणेत आलेले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८८ विषय क्रमांक – २२

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/१६४/२०२०, दि.२९/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०७।नवि-१३, दि.९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०९।१९८५/प्र.क्र.१८९३।०९।नवि-१३, दि.१८।०८।२००९, व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२।१६०।प्र.क्र.५८। १२/पुर्नबांधणी क्र.२७।१२/ई.पी.-मंजूरी/नवि-१३ दि. ०२।०३।२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील स.नं.७३,७४,७५ व ७६ पै. मध्ये १२.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील स.नं.७३,७४,७५ व ७६ पै. मधील १२.०० मी. रूंद रस्त्याचे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. मौजे किवळे येथील स.नं.७३,७४,७५ व ७६ पै. येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं ७३ ते ७६ येथील मंजूर

विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.४००, दि.०६।०६।२०१९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी येणा-या भूसंपादन खर्चास मान्यता आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं.७३,७४,७५ व ७६ पै. या जागेवरील नियोजित १२.०० मी. रूंद रस्त्याने भूसंपादन नवीन भूसंपादन अधिनियम – २०१३ अन्वये संपादन करणेकामी येणा-या भूसंपादन खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९८९ विषय क्रमांक – २३

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – आपत्ती व्यवस्थापन

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.आप.व्य/०१/कावि/५९७/२०२०, दि.२८/१२/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कम्युनिटी किचन करीता आवश्यक असलेले धान्य भारतीय अन्न महामंडळ यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे मार्फत गहू 23,780/- प्रती टन व तांदूळ 22,500/- प्रती टन या दराने खरेदी केले आहे. भारतीय अन्न महामंडळ यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे कडून धान्य पुरवठा दिनांक 30/06/2020 पासून बंद करणेत आला आहे. त्यामुळे मे अग्रसेन कम्युनिटी किचन, चिचंवड यांनी जेवण तयार करणेकामी, स्वता खरेदीकरून वापरलेले धान्याचे पैसै, ज्या शासकीय दराने मनपाने धान्य खरेदी केले आहे त्याच दराने त्यांना अदा करणे आवश्यक आहे. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मे. अग्रसेन कम्युनिटी किचन, चिचंवड यांनी स्वता खरेदी केलेले धान्याचे खालिल प्रमाणे पैसे देय आहे.

| धान्यांचा प्रकार | संस्थेने खरेदी केलेले धान्य (कि.ग्रॅ) | धान्य खरेदीचा शासकीय दर (प्रती किलो ग्रॅम) | संस्थेला देय असलेली रक्कम रूपये ( 2 x3 ) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| गहू | 51300 | 23.78 | 12,19,914.00 |
| तांदूळ | 44850 | 22.50 | 10,09,125.00 |
| | एकूण रक्कम रूपये | | 22,29,039.00 |

उपरोक्त प्रमाणे मे.अग्रसेन, चिचंवड यांना धान्य खरेदीपोटी देय असलेली एकूण र.रू.22,29,039/- (अक्षरी रक्कम रूपये बावीस लाख एकोणतीस हजार एकोणचाळिस फक्त) चे खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरचा खर्च भांडार विभागाकडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेत येईल. मे.अग्रसेन,

चिचंवड यांना धान्य खरेदीपोटी देय असलेली एकूण र.रू.22,29,039/- (अक्षरी र.रू.बावीस लाख एकोणतीस हजार एकोणचाळीस फक्त) संस्थेचे अध्यक्ष श्री.सुनिल जयकुमार अगरवाल यांचे नावे अदा करणेस तसेच सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९० विषय क्रमांक – २४

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/२४७/२०२०, दि.२९/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चालु करणेत आलेली कोविड केअर सेंटर्स दि.१५.१०.२०२० पासुन बंद करणेत आलेली आहेत. परंतु रुग्णसंख्या चालुच असलेने कामकाज बंद करता येत नसलेने चालु ठेवणेस सांगीतले होते. मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७३३२ दि.१२.०८.२०२० अन्वये तिन महीने कालावधीकरीता EOI04/01/2020-21 मध्ये नमूद केले प्रमाणे वायसीएमएच येथील ICU 1, ICU 2, चालू करणेकामी मान्यता दिलेली आहे. मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांची कामाची मुदत पूर्ण झालेली आहे. वायसीएमच यांचेकडील दिनांक ०२.११.२०२० चे मान्य प्रस्तावातील उपाययोजना क्र.६ नुसार दोन आयसीयु ची करारनामा मुदत दि.१० नोव्हेंबर २०२० संपणार आहे. त्यास आणखी तिन महिने मुदतवाढ देण्यात यावी असे नमूद आहे. सदरची मुदतवाढ EOI क्र.०४/१/२०२०-२१ मध्ये नमूद केले प्रमाणे कोविड-१९ पूर्णपणे नाहीसा होईपर्यत किंवा ९० दिवस या पैकी जे आधी होईल त्या प्रमाणे प्रति बेड र.रु.७,५००/- या दराने EOI 04/01/2020-21 शी संलग्न राहून करारनामा करणेस व अनामत रक्कम घेऊन मान्यता आवश्यक आहे याकामी र.रु.२,०२,५०,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी दोन लाख पन्नास हजार फक्त) एवढा खर्च येणार असलेने त्यांचेशी करारनामा करणेस आणि कामाचे आदेश देणेकामी सदर खर्चास मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना १०.११.२०२० पासुन पुढे मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९१ विषय क्रमांक – २५

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/काविज/१२/१३१/२०२०, दि.२४/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभागातील विविध विकास कामांसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या कामा समोरील रकाण्यामध्ये उल्लेख केलेल्या प्रभाग क्र.१६ मधील रावेत भागातीस स.नं.१०३ ते १४७ पर्यंतचा २४.०० मी. डी.पी. रस्ता, सदर रस्त्याला जोडणारे १८.०० मी., १२.०० मी. डी.पी व इतर रस्ते विकसित करणे या कामासाठी मे.इन्फ्राकिंग कंन्स्लटिंग इंजिनिअर्स प्रा.लि. यांना त्यांनी

नमुद केलेल्या लघुत्तम दरानुसार १.९९% व आरक्षण क्र.२२१ येथे बहुउद्देशिय क्रिडांगण विकिसत करणेकामी मे.शिल्पी आर्किटेक्ट अँण्ड प्लॅनर्स या सल्लागारांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व त्यांनी नमुद केलेल्या लघुत्तम दरानुसार १.९१% फी (निविदा पूर्व व निविदा पश्चात करावयाचे कामासाठी एकत्रित) अदा करणेस व त्यांचे सोबत करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९२ विषय क्रमांक – २६

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/५/कावि/१५०/२०२०, दि.२९/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समितीने यापूर्वी मान्य केलेल्या एकत्रित दराचा विचार करता Ms.HCP Design Planning & Management Pvt.Ltd. यांचा DPR तयार करुन मान्यता घेणेचा मंजूर दर र.रु.११,१५,०००/- + GST प्रति किमी असा येत आहे. त्यानुसार पवना नदीसाठी वाढीव लांबी (२४.३४ - १८.०० = ६.३४ कि.मी.) साठी र.रु.७०,६९,१००/- व इंद्रायणी नदीसाठी वाढीव लांबी (२०.८५ - १६.०० =४.८५ कि.मी.) साठी र.रु.५४,०७,७५०/- इतकी येत आहे. त्यानुसार Ms. HCP Design Planning & Management Pvt Ltd. यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार प्रत्यक्ष येणा-या नदीच्या लांबीसाठी प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन त्यास शासन मान्यता घेणेच्या कामासाठी प्रत्यक्ष सर्व्हेनुसार वाढणा-या लांबीच्या प्रमाणात पवना व इंद्रायणी नदीसाठी करारनाम्यानुसार अनुक्रमे र.रु.७०,६९,१००/- व र.रु.५४,०७,७५०/- इतकी सुधारित वाढीव फी करारनाम्यातील टप्प्यानुसार अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९३ विषय क्रमांक – २७

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – उद्यान

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/०२/कावि/३४६/२०२०, दि.३०/१२/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागामार्फत निविदाद्वारे उद्यान देखभाल संरक्षण काम करारनामा करून वेळोवेळी कामकाज करून आदेश देऊन कामे करून घेणेत येतात. सदरचा कालावधी दोन वर्षाचा असतो. मा.आयुक्तसो यांचेकडील दि.३१/१०/२०१८ चे मान्य प्रस्तावानुसार उद्यान देखभालीची कामे विविध प्रचलित कार्यपध्दतीनुसार निविदाद्वारे सोपविणेऐवजी कामकाजाच्या सोईच्या दृष्टिने सर्व उद्यानांची देखभाल कामाची निविदा एकाच वेळी दोन वर्ष कालावधीसाठी क्षेत्रीय कार्यालयानुसार निविदा प्रस्तावीत करणेच्या सुचना प्राप्त झाल्या यामध्ये मोठी उद्याने वेगवेगळी करून त्याप्रमाणे

साधारण १४ निविदा प्रस्तावित करणेत आलेल्या होत्या.तथापी खालील परीशिष्ठ नमुद केलेल्या उद्यान कामाची मुदत साधारण नोव्हेंबर.२०२० मध्ये संपत आहे. देखभाल कामात खंड पडून देता नाही. उपरोक्त १ ते ६ निविदा मधील उद्यानाचे देखभाल कालावधी नोव्हेंबर २०२० पर्यंत मूदत असून उपरोक्त निविदा नोटीस क्रमांक उद्यान १ /२०१९-२० सद्यस्थीतीत सदरच्या निविदेतील ठेकेदार न्यायालयात गेल्यामुळे कोर्ट केस चालु आहे.कोरोणा विषाणुंचा प्रादुर्भाव वाढु नये या खबरदारीच्या कारणास्तव कोर्टाची कार्यवाही स्थगित आहे. त्यामुळे कोर्टाचा निकाल लागण्यास विलंब लागु शकतो.व अ.क्र.७ निविदा नोटीस क्र.३/२०-२१ मधील बाब क्र.५ अंतीम टप्यात असल्याने त्यामुळे सदरच्या निविदा अंतिम होईपर्यंत फेब्रुवारी २०२१ अखेर मुदतवाढ देणे आवश्यक असून प्रपत्र अ नुसार ८ उद्यानांच्या देखभाल कामांची मुदतवाढ निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत फेबुवारी २०२०-२१ अखेरच्या खर्चास तसेच सदर उद्यानांच्या मुळ निविदेच्या अटी/शर्तीस व करारनाम्यास अधीन राहून पुढील खर्चाचे मुद्राक स्विकारूनमान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९४ विषय क्रमांक – २८
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, आरोग्य
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.बक्षेका/५/कावि/४८०/२०२०, दि.२९/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरणासाठी चार रिक्षा टेंपो (तीन चाकी) वाहन इंधन व वाहनचालकासह प्रति दिन भाडयाने घेणेबाबत कामकाजासाठी निविदा नोटीस क्र.१/२०२०-२१ निविदा र.रु.३१,७०,०००/- करीता २ वर्ष कालावधीसाठी मे.यश एन्टरप्रायझेस यांचा -२८.५१०% कमी (प्रति टेंम्पो प्रति दिन ८९३.६२५/-) हा दर सर्वात लघुत्तम असल्याने स्विकारणेबाबत दि.२९/१२/२०२० च्या प्रस्तावानुसार येणा-या र.रु.२२,६६,२३३/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९५ विषय क्रमांक – २९
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.शिमं/०९/कावि/४२३/२०२०, दि.३०/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०२०-२१ सालाकरिता मनपा प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांसाठी मे.अंशुल प्रकाशन यांचे "आम्ही घडलो वाचनाने" हे पुस्तक खरेदी करणेकामी येणा-या र.रु.१,०९,४४६/- (अक्षरी र.रू.एक लाख नऊ हजार चारशे शेहेचाळीस फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३(क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७९९६ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – आरोग्य मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/२४८/२०२०, दि.३०/१२/२०२०

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर(CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना खाजगी ठिकाणी (CCC) चालविणेस देणेबाबत...

विषय क्रमांक ३० चा विचार दिनांक २७/०१/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९७ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९०३/२०२०, दि.३०/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७२३०, दिनांक १०/०७/२०२० नुसार कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी M/s.Jai Bhawani Enterprises यांनी सादर केलेल्या लघुत्तम दर प्रति कर्मचारी प्रति महाप्रमाणे र.रु.२८,०२१/- नुसार (कमी केलेल्या दरानुसार) डेड बॉडी डिसपोजल करणेकामी २४ कर्मचारी (१६ कर्मचारी कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम व ०८ कर्मचारी ऑटो कलस्टर) उपलब्ध करुन देणेकामी येणा-या र.रु.२८,०२१/- X २४ = र.रु.६,७२,५०४/- प्रमाणे २ महिनेकरीता M/s.Medbros Healthcare Pvt. Ltd., यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून २४ कर्मचारी उपलब्ध करुन देणेकामी येणा-या र.रु.१३,४५,००८/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९८ विषय क्रमांक – ३२
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/१८३/२०२०, दि.३०/१२/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग अ मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 4) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ७९९९ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्य.सा.भां.(वैद्य)
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९०५/२०२०, दि.३१/१२/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयात कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी १६ स्वतंत्र कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबतM/s.Jai Bhawani Enterprises यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून त्यांनी सादर केलेल्या लघुत्तम दरानुसार (कमी केलेल्या दरानुसार) म्हणजे र.रु.२८,०२१/- प्रति कर्मचारी प्रति महाप्रमाणे प्रतिमहा र.रु.४,४८,३३६/- प्रमाणे पुर्वीच्या आदेशातील मुदत संपुष्टात आलेल्या तारखेपासून पुढील २ महिनेकरीता येणा-या र.रु.८,९६,६७२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००० विषय क्रमांक – ३४
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्य.सा.भां.(वैद्य)
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ–मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९०६/२०२०, दि.३१/१२/२०२०

मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७७६८, दिनांक १६/१२/२०२० अन्वये Covid-19 अंतर्गत कोविड केअर सेंटरचे(CCC) कामकाजाकरीता M/s.Guruji Infrastructdure Pvt. Ltd., यांचे र.रु.३,७७,४६८/-, मे.रक्षक ग्रुप ऑफ कंपनीज यांचे र.रु.२,१२,२३५/- व मे.तावरे फॅसीलिटी मॅनेजमेंट सर्व्हीसेस् प्रा.लि., यांचे र.रु.६,२६,००२/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे. मे.रक्षक ग्रुप ऑफ कंपनीज यांनी माहे जुलै २०२० व माहे ऑगस्ट २०२० या दोन महिन्याचे बिल सादर केले होते. परंतु विषयपत्र सादर करताना माहे जुलै २०२० चे बिल र.रु.२,१२,२३५/- करीताच मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.त्यामुळे मे.रक्षक ग्रुप ऑफ कंपनीज यांना Covid-19 अंतर्गत कोविड केअर सेंटरचे(CCC) केलेल्या कामकाजाकरीता माहे ऑगस्ट २०२० या कालावधीचे सादर केलेले बिल र.रु.७४,९०६/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००१ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/८८६/२०२०, दि.३१/१२/२०२०

विषय - चिंचवड मैलाशुद्धीकरण केंद्रांअंतर्गत प्रभाग क्र.10 मधील विद्यानगर, दत्तनगर व इतर

परिसरात जलनि:सारण विषयक सुधारणा करणे व उर्वरित ठिकाणी जलनि:सारण विषयक कामे करणे...

विषय क्रमांक ३५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००२ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/८८७/२०२०, दि.३१/१२/२०२०

विषय - प्रभाग क्र.32 मधील परिसरात वार्षिक ठेकेदारी पद्धतीने ममतानगर, जयमालानगर, मधुबन, सांगवी व उर्वरीत भागामध्ये ड्रेनेज लाईनची व चेंबरची देखभाल दुरुस्तीकरणे

विषय क्रमांक ३६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००३ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/६६६/२०२०, दि.१५/१२/२०२०

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणा-या विविध योजना, कार्यक्रम, उपक्रम इ. ची माहिती नागरिकांपर्यंत त्वरित पोहचविण्यासाठी क्रिएटिव्ह इमेज कंटेंट तयार करून मनपाच्या फेसबुक, ट्वीटर, इंस्टाग्राम, मा.मनपा पदाधिकारी, नगरसदस्य, अधिकारी यांच्या Whatsapp वर पाठविणे आवश्यक आहे. यासाठी क्रिएटिव्ह इमेज कंटेंट तयार करून घेणेकामी कोटेशन नोटीस क्र.०१/२०२०-२१ अन्वये इच्छुक अनुभवी व्यावसायिकांकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार मे.K10 Media Solutions, Narayan Peth, Pune-30 यांचे लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. तथापि मे.K10 Media Solutions, Narayan Peth, Pune-30 यांच्या कडून र.रु. १,४४०/- प्रती क्रिएटिव्ह इमेज कंटेंट दराने र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) पर्यंत च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००४ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/६६७/२०२०, दि.१५/१२/२०२०

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे नागरिक कोरोना (COVID-19) संशयित सापडले पासून ते कोरोना (COVID-19) रुग्ण कोरोनामुक्त होईपर्यंत त्याची कशाप्रकारे काळजी घेतली जाते, त्याच्यावर कश्याप्रकारे उपचार केले जातात याबाबत नागरिकांना माहिती देणेकामी मनपाची कार्यप्रणाली Documentary स्वरूपामध्ये तयार करण्याचे नियोजन होते. याकामी मा. आयुक्त यांनी दिलेल्या सूचनेनुसार मनपाची मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील कार्यप्रणाली Documentary स्वरूपामध्ये रुग्णांचे मनोगत/अनुभव, मा.आयुक्त व कोरोना बाधितांवर उपचार करणारे डॉक्टर, परिचारिका यांच्या मुलाखती करण्यात येणारे नियोजन इ. चित्रित करूणेकामी नि.नो.क्र.०२/२०२०-२१ अन्वये अनुभवी व्यावसायिकांकडून दरपत्रक पत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार एकूण तीन व्यावसायिकांचे दरपत्रक प्राप्त झाले होते. त्यापैकी मे.देवदत्त फोटोग्राफी यांचे र.रु.२,९०,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख नव्वद हजार फक्त) चे लघुत्तम दर प्राप्त झालेने त्यांना सदरचे कामकाज करण्याचे आदेश देण्यात आले होते. प्राप्त कामकाज आदेशानुसार मे.देवदत्त फोटोग्राफी यांनी तयार केलेल्या सदर Documentary चे महाराष्ट्र राज्याचे मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.खासदार शरदचंद्रजी पवार, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, अण्णा बनसोडे, मा.विभागीय आयुक्त सौरव राव इ. समोर सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच मनपाच्या विविध सोशल मिडिया माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आले. नमूद Documentary मनपाच्या भविष्यातील कामकाजासाठी देखील जतन करण्यात आली आहे. तरी कोटेशन नोटीस क्र.०२/२०२०-२१ अन्वये मे.देवदत्त फोटोग्राफी यांनी तयार केलेल्या Documentry कामी झालेल्या र.रु.२,९०,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख नव्वद हजार फक्त) च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००५ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/६६८/२०२०, दि.१५/१२/२०२०

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) चा वाढता प्रादुर्भावाचा काळामध्ये नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक होते. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर येथे कोरोना (COVID-19) संशयित सापडले पासून ते कोरोनामुक्त होईपर्यंत त्याची मनपाच्या वतीने कशा प्रकारे काळजी घेतली जाते, त्याच्यावर कश्याप्रकारे उपचार केले जातात याबाबत नागरिकांना माहिती देणेकामी मनपाची कार्यप्रणाली Documentary स्वरूपामध्ये तयार करून जतन करण्याचे उद्दिष्ट होते. याकामी मा.आयुक्त यांनी दिलेल्या सूचनेनुसार कोविड केअर सेंटरच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती देणारी Documentary तयार करणेकामी कोटेशन नोटीस क्र.०३/२०२०-२१ अन्वये इच्छुक अनुभवी व्यावसायिकांकडून दरपत्रक पत्रक मागविण्यात आले होते.

त्यानुसार एकूण तीन व्यावसायिकांचे दरपत्रक प्राप्त झाले होते. त्यापैकी मे.Point of View यांचे र.रु.२,८३,२००/- (अक्षरी र.रु.दोन लाख त्र्याऐंशी हजार दोनशे फक्त) चे लघुत्तम दर प्राप्त झालेने त्यांना सदरचे कामकाज करण्याचे आदेश देण्यात आले होते. प्राप्त कामकाज आदेशानुसार मे. Point of View यांनी मनपाच्या वतीने उभारण्यात आलेल्या विविध कोविड केअर सेंटर्समध्ये कोरोना संशयित व बाधित लोकांवर करण्यात येणारे उपचार, त्यांची घेण्यात येणारी काळजी आदी बाबींचा समावेश असलेली Documentary 4k Format मध्ये चित्रित करून इकडील विभागास सादर केली आहे. सदर Documentary चे महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा. खासदार शरदचंद्रजी पवार, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, अण्णा बनसोडे, मा.विभागीय आयुक्त सौरव राव इ. समोर सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच मनपाच्या विविध सोशल मिडिया माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आले. नमूद Documentary मनपाच्या भविष्यातील कामकाजासाठी देखील जतन करण्यात आली आहे. तरी कोटेशन नोटीस क्र.०३/२०२०-२१ अन्वये मे.Point of View यांनी तयार केलेल्या Documentry कामी झालेल्या र.रु.२,८३,२००/- (अक्षरी र.रु.दोन लाख त्र्याऐंशी हजार दोनशे फक्त) च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००६ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/६६९/२०२०, दि.१५/१२/२०२०

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) चा वाढता प्रादुर्भावाचा काळामध्ये नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक होते. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या वॉररूमच्या कामकाजाची प्रणाली तसेच मा.महापौर, उपमहापौर, सत्तारूढ पक्षनेते, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेते, पदाधिकारी, आयुक्त व डॉक्टर्स यांच्या यांच्या जनजागृतीपर मुलाखती चित्रित करून Documentary स्वरूपामध्ये तयार करून जतन करण्याचे उद्दिष्ट होते. याकामी मा.आयुक्त यांनी दिलेल्या सूचनेनुसार वॉररूमच्या कामकाजाच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती देणारी Documentary तयार करणेकामी कोटेशन नोटीस क्र.०४/२०२०-२१ अन्वये इच्छुक अनुभवी व्यावसायिकांकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार एकूण तीन व्यावसायिकांचे दरपत्रक प्राप्त झाले होते. त्यापैकी मे.Point of View यांचे र.रु.१,७७,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख सत्याहत्तर हजार फक्त) चे लघुत्तम दर प्राप्त झालेने त्यांना सदरचे कामकाज करण्याचे आदेश देण्यात आले होते. प्राप्त कामकाज आदेशानुसार मे.Point of View यांनी तयार केलेल्या सदर Documentary चे महाराष्ट्र राज्याचे मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.खासदार शरदचंद्रजी पवार, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, अण्णा बनसोडे, मा.विभागीय आयुक्त सौरव राव इ. समोर सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच मनपाच्या विविध सोशल मिडिया माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आले. नमूद Documentary मनपाच्या भविष्यातील कामकाजासाठी देखील जतन

करण्यात आली आहे. तरी कोटेशन नोटीस क्र.०४/२०२०-२१ अन्वये मे.Point of View यांनी तयार केलेल्या Documentry कामी झालेल्या र.रु.१,७७,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख सत्याहत्तर हजार फक्त) च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००७ विषय क्रमांक – ४१
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/०१/२०२१, दि.०१/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी आ. क्र.९९ (खेळाचे मैदान), आ.क्र.१०१ (दवाखाना), आ.क्र.१०२ (माध्यमिक शाळा), आ.क्र.१०३ (किरकोळ बाजार) आ.क्र.१०४ (उद्यान) व ९.०० मी. रस्ता याकामी त्यांचे कार्यलया मार्फत मोजणी ता.ह.का.मो.र.नं. ४९५४/२०२०, दिनांक ०२/११/२०२० अन्वये केलेली असून त्य अंतर्गत सि.स.नं. ५४४२ ते ५४४८, ५४६९, तसेच ५४२७, ५४२९, ५४३२, ५४३३, ५४३३/१ ते ५४३३/९, ५४३४, ५४३४/१ ते ५४३४/२, ५४३५, ५४३७, ५४३७/१ ते ५४३७/११, ५४३९, ५४४९ व ५४५० यांची मोजणी केलेली आहे. तथापी या मोजणी मध्ये सि.स.नं. ५४२७, ५४२९, ५४३२, ५४३३, ५४३३/१ ते ५४३३/९, ५४३४, ५४३४/१ ते ५४३४/२, ५४३५, ५४३७, ५४३७/१ ते ५४३७/११, ५४३९, ५४४९ व ५४५० या जादा मिळकतीची मोजणी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी केलेली असुन त्याकामी तातडी मोजणी फी र.रु.१,३६,०००/- ची मागणी महानगरपालिकेकडे केलेली आहे. त्यास अनुसरुन मौजे पिंपरी वाघेरे मधिल मिळकत सि.स.नं.५४२७, ५४२९, ५४३२, ५४३३, ५४३३/१ ते ५४३३/९, ५४३४, ५४३४/१ ते ५४३४/२, ५४३५, ५४३७, ५४३७/१ ते ५४३७/११, ५४३९, ५४४९ व ५४५० यांचे मोजणीकामीची तातडी मोजणी फी र.रु.१,३६,०००/- नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांना अदा करणे आवश्यक आहे. तरी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी कळविलेली मौजे पिंपरी वाघेरे मधिल मिळकत सि.स.नं. ५४२७, ५४२९, ५४३२, ५४३३, ५४३३/१ ते ५४३३/९, ५४३४, ५४३४/१ ते ५४३४/२, ५४३५, ५४३७, ५४३७/१ ते ५४३७/११, ५४३९, ५४४९ व ५४५० यांचे मोजणी कामीची तातडी मोजणी फी र.रु.१,३६,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००८ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/५१८/२०२०, दि.३१/१२/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संपुर्ण राज्यामध्ये दिनांक 15 सप्टेंबर 2020 ते 16

ऑक्टोबर 2020 या कालावधीत माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम राबविणेकामी मा.मुख्यमंत्री यांनी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मनपा हद्दीमध्ये सदर मोहीम राबविण्यात येणार असल्याने वैदयकिय विभागाच्या मागणी नुसार मागणी केलेल्या साहित्यापैकी तातडीचे आवश्यक साहित्य 25 टक्के प्रमाणे स्थानिक बाजारातील व्यवसायकृत पुरवठा धारकाकडून तातडीने उपलब्ध करुन उर्वरित सहित्य अल्प मुदतीची जाहिर सुचनेतील प्राप्त लघुत्तम दरानुसार 25 टक्के साहित्य मे. सुविधा टेक्सटाईक्स, सोलापुर या पुरवठा करणा-या पुरवठा धारकास बिल अदागयी करणेत यावी याबाबत निर्देश दिलेले आहे. त्यानुसार भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महापालिका अधिनियम कलम ६३(६) तसेच The Disaster management act 2005 अन्वये थर्मल 1000 गन (INFRARED THERMOMETER) 1000 नग व FINGER TIP PULSE OXIMETER1000 नग तातडीच्या खरेदीकामी अल्प मुदतीची जाहिर सुचना क्रं 24/2020-21 प्रसिध्द करणेत आली होती. त्यामध्ये मे.व्हि.एम.शिंदे. सांगवी यांचे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार वरिल प्रमाणे एकुण 02 बाबी करिता एकुण 25 टक्के प्रमाणे 500 गन (INFRARED THERMOMETER) 500 नग व FINGER TIP PULSE OXIMETER पुरवठा करणारे पुरवठा धारक मे.सुविधा टेक्सटाईक्स, सोलापुर र.रु.7,84,200/- (अक्षरी र.रू.सात लाख चौ-याऐंशी हजार दोनशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८००९ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – उद्यान

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/०१/२०२१, दि.०१/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणि संग्रहालय या ठिकाणी १.पशुवैद्यक २.क्युरेटर या अभिनामाचे पदांवर दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी (तात्पुरत्या) स्वरुपात ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेसाठी स्थानिक वृत्तपत्रातून आणि मनपा संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती गठित निवड समितीमार्फत घेण्यात आल्या होत्या.सदर निवड समितीने १.पशुवैद्यक या अभिनामाचे पदाकरिता डॉ.श्रीम.पूजा शंकर बोंबले यांची दरमहा र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) व २.क्युरेटर या अभिनामाचे पदावर डॉ.श्री.घनश्याम मोहन पवार यांची दरमहा र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) या मानधनावर नियुक्ती करणेकामी शिफारस केली आहे. सबब १.पशुवैद्यक या अभिनामाचे पदाकरिता डॉ.श्रीम.पूजा शंकर बोंबले यांची दरमहा र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) व २.क्युरेटर या अभिनामाचे पदावर डॉ.श्री.घनश्याम मोहन पवार यांची दरमहा र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरिता नियुक्ती तथा मानधन खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१० विषय क्रमांक – ४४
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मातंवि/१६/कावि/३४७/२०२०, दि.२४/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोविड – १९ चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता रुग्णालयांचे मागणीनुसार तातडीची बाब म्हणुन मनपाचे विविध ठिकाणी कार्यरत कोवीड रुग्णालये, दवाखाने याठिकाणी डॅशबोर्ड संगणक प्रणालीमध्ये डेटा एन्ट्री चे कामकाज करणेकामी कोपा पासा प्रशिक्षण पुर्ण झालेल्या एकूण ४० Data entry operator यांना आवश्यकतेनुसार मानधनावर ३ महिने कालावधीसाठी अथवा तत्पुर्वी Covid-19 बाबतचे कामकाज संपुष्टात आल्यास सदर कालावधीपर्यंत मानधनावर नेमणूक करणेकामी आदेश क्र.मातवि/१६/कावि/ २६६/२०२० दि.०१/१२/२०२० अन्वये करण्यात आलेल्या आदेशानुसार व सदरकामी प्रति डेटा इंन्ट्री ऑपरेटर साठी प्रतिमहा मानधन र.रू.१९,२५०/- याप्रमाणे ४० डेटा इंन्ट्री ऑपरेटर यांना ३ महिने कालावधीसाठी येणा-या एकुण र.रु. २३,१०,०००/- (अक्षरी र.रु. तेवीस लाख दहा हजार फक्त) इतक्या खर्चास व सदरचा खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या "ई-गव्हर्नन्स"या लेखाशिर्षामधून करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०११ विषय क्रमांक – ४५
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मातंवि/१२/कावि/०३/२०२१, दि.०१/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा व इतर कार्यालयांना इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणेकामी निविदा सूचना क्रमांक १०/२०१९-२० नुसार लघुत्तम निविदा धारक मे.इंटेक एंटरप्रायझेस यांना महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा व इतर कार्यालयांकरीता इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणेचे कामकाजासाठी चार महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेचे कामास येणारा खर्च र.रू. २२,४८,३०२/- अधिक प्रत्यक्षातील जीएसटी या दराने चार महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी येणा-या खर्चास मान्यता व त्या अनुशंगाने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१२ विषय क्रमांक – ४६
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/०२/२०२१, दि.०१/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/26/52/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२४ मध्ये नवीन पावसाळी गटर्स टाकणे व दुरुस्तीची कामे करणेकामी आर जी मंगळवेढेकर नि.र.रू.37,26,949/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख सव्वीस हजार नऊशे एकोणपण्णास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,93,249/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,93,249/- पेक्षा 34.77% कमी म्हणजेच र.रु.24,09,106/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,413/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.33,700/- = एकुण र.रु.24,44,219/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१३ विषय क्रमांक – ४७
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/५८९/२०२०, दि.०१/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.32/20/2020-21 अन्वये सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१८ मधील मनपा इमारतींची देखभाल दुरूस्ती कामे करणेकामी मे.अनुष एन्टरप्रायजेस नि.र.रू.37,49,319/- (अक्षरी र.रु.सदोतिस लाख एकोणपंन्नास हजार तीनशे एकोणिस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,19,319/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,19,319/- पेक्षा 32.97% कमी म्हणजेच र.रु.24,93,060/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.12,853/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.30,000/- = एकुण र.रु.25,35,913/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१४ विषय क्रमांक – ४८
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/५८८/२०२०, दि.०१/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.32/12/2020-21 अन्वये सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१८ मधील मनपा शाळा इमारतींची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.अनुष एन्टरप्रायजेस नि.र.रू.41,33,693/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख तेहतिस हजार सहाशे त्र्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,03,693/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,03,693/- पेक्षा 31.98% कमी म्हणजेच र.रु.27,23,312/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.12,853/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.30,000/- = एकुण र.रु.27,66,165/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१५ विषय क्रमांक – ४९
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/५८७/२०२०, दि.०१/०१/२०२१

विषय - प्रभाग क्र १६ मधील रावेत भागातील गुरूद्वारा परिसरातील पेव्हींग ब्लॉक, स्टॉर्म वॉटर लाईनची दुरूस्ती व स्थापत्य विषयक कामे करणे.

विषय क्रमांक ४९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१६ विषय क्रमांक – ५०
दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/५८६/२०२०, दि.०१/०१/२०२१

विषय - सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१६ मधील रावेत व किवळे मधील मनपा शाळा इमारतींची देखभाल दुरूस्ती करणे.

विषय क्रमांक ५० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१७ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/५८५/२०२०, दि.०१/०१/२०२१

विषय - सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१६ मधील किवळे मामुर्डी विकासनगर मधील मनपा शाळा इमारतीची देखभाल दुरूस्ती करणे...

विषय क्रमांक ५१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१८ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/०१/२०२१, दि.०१/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व महापालिका अधिनियम कलम ६३(३) मधील तरतुद विचारात घेता वरील संसर्गजंन्य रोग नियंत्रणात आणणेसाठी, प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असलेने मनपाचे विविध रुग्णालये,जम्बो कोविड सेंटर व ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल करीता आवश्यक लागणारे PPE Kit with N95 Mask खरेदी करणेकामी अल्पमुदतीची ई-निविदा सुचना क्र.३५/२०२०-२१ अन्वये मे.एच.क्यु.लँम्पस मॅन्युफँक्चरींग को.प्रा.लि. यांचेकडुन प्राप्त झालेला निविदा लघुत्तम दर र.रु.१९४ + GST प्रती किट प्रमाणे पी.पी.ई.१,००,००० किट खरेदी करणेकामी एकूण र.रु.१,९४,००,०००+GST चे खर्चास भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महापालिका अधिनियम कलम ६३(६) कलम ६७(३)(क) नुसार खरेदी करणेकामी करारनामा करून येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध रुग्णालय, जंबो कोविड सेंटर व अटोक्लस्टर कोविड हॉस्पिटलकरिता आवश्यक लागणारे PPE Kit with N95 Mask खरेदी करणेकामी ईनिविदा क्र.३५/२०२०-२१ साठी लघुत्तम निविदाधारक मे.एच.क्यू.लॅम्प्स मॅन्युफॅक्चरींग कंपनी प्रा.लि. यांचेकडून लघुत्तम दर र.रु.१९४ अधिक जीएसटी असा प्राप्त झाला आहे. मे.एच.क्यू.लॅम्प्स मॅन्युफॅक्चरींग कंपनी प्रा.लि.यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता मिळणेबाबतचा विषय क्र.५२ दि.०१/०१/२०२१ रोजी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम ४१ व ५० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३) (क) आणि ७३(क) नुसार मा.स्थायी समितीसमोर दाखल केलेला असला तरी दि.०५/०१/२०२१ चे पत्रान्वये मे.एच.क्यू.लॅम्प्स मॅन्युफॅक्चरींग कंपनी प्रा.लि. यांनी शेतकरी अंदोलन दिल्ली, हरियाना या सीमेवर असलेने त्यांची कंपनी मागील ४० दिवसांपासून बंद असल्याने PPE Kit पुरविणेकामी असमर्थता दर्शविली असल्याने तातडीचे बाब म्हणून निविदेतील इतर पुरवठाधारक १. मे.केप्स फार्मा, मुंबई व २.मे.कोठारी मेडिकल पिंपरी यांनी लघुत्तम दर म्हणजेच र.रु.१९४ अधिक जीएसटी यादराने पुरवठा करण्याची तयारी

दर्शविली असल्याने दोनही निविदाधारकास निविदा संखेच्या प्रत्येकी ५० टक्के च्या परिमाणात पुरवठा आदेश देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्येकी मे.केप्स फार्मा, मुंबई र.रु.९७,००,०००/- व मे.कोठारी मेडिकल, पिंपरी र.रु.९७,००,०००/- असा एकूण खर्च र.रु.१,९४,००,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी चौ-याण्णव लाख फक्त) व मे.केप्स फार्मा, मुंबई व मे.कोठारी मेडिकल, पिंपरी यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०१९ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १३/०१/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सारिका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव विचारात घेऊन –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.३ दि.११/१२/२०२० अन्वये मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थांबरोबर शिक्षकांचा ही अद्यावत वाचनाची माहिती मिळावी. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना "शब्दवेद" पुस्तक शिक्षकांसाठी वाचनासाठी व विद्यार्थांना शिक्षणासाठी प्रेरणा देणारे आहे. तरी मे.महाजन ब्रदर्स यांचेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांसाठी "शब्दवेद" हे पुस्तक सन २०२१-२२ साठी थेट पद्धतीने खरेदी करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्य यांची मागणी असली तरी प्रस्तूत विषयातील एजन्सीकडून एकूण किती पुस्तके खरेदी करणार व त्यासाठी एकूण किती खर्च येणार हे प्रशासनाने तपासून मा.स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२० विषय क्रमांक – ५४

दिनांक – १३/०१/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव विचारात घेऊन –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.९ दि.११/१२/२०२० अन्वये मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांनी प्रस्तावित केलेनुसार भारतामध्ये सर्वत्र Covid-19 या संसर्गजन्य रोगाची साथ चालू असल्याने गेली काही महिने लॉकडाऊन असल्याने सर्व शाळा बंद होत्या. सद्यस्थितीत राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार शाळा सुरु होण्याचे संकेत दिलेले आहे. पिंपरी चिंचवड

महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्ये ही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थांच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार शाळा सुरु झाल्यानंतर शाळेत येणा-या विद्यार्थांच्या कोरोना रोगाचा प्रादुर्भाव हा पूर्णपणे संपलेला नसल्याने आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे असणार आहे. तरी विद्यार्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळा निर्जंतुकीकरण (सॅनिटायझर) करून घेणेस तसेच होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्य यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा सुरू करणेपुर्वी सॅनिटायझर करून घेणे आवश्यक आहे. सॅनिटाईझिंग महापालिकेच्या आरोग्य / वैद्यकीय विभागाकडून केले जाणार किंवा खाजगी एजन्सीकडून करणार तसेच याकामी किती खर्च येणार आहे. हे तपासून प्रशासनाने मा.स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२१ विषय क्रमांक – ५५

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग - क्रीडा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३६३/२०२०, दि.०२/११/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२ दि.११/१२/२०२० अन्वये मा.महापालिका आयुक्त यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ८२ व्यायामशाळा म.न.पा. परिसरात चालविल्या जात असुन त्यापैकी ५० व्यायामशाळा दरमहा २०००/- सेवाशुल्क देऊन मनपा परिसरातील सार्वजनिक संस्था मंडळे यांना ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या आहेत. त्यापैकी खालील ३६ व्यायामशाळांची मुदत संपुष्टात येत असल्याने संबधीत संस्थांनी मुदतवाढ मिळणेकामी अर्ज केलेला आहे.

| अ.क्र | व्यायामशाळेचे नांव | संस्था/मंडळाचे नाव |
|---|---|---|
| १ | विद्यानगर रामनगर व्यायामशाळा | इलेव्हन फ्रेंडस् स्पोर्टस क्लब |
| २ | संभाजीनगर व्यायाम शाळा,चिंचवड | साई शारदा महिला बचत गट चिंचवड |
| ३ | कै.आकाश काळभोर व्या.शाळा आकुर्डी | हिंदुस्थान रिलाएबल स्पोटर्स क्लब,आकुर्डी |
| ४ | बाहुबली व्यायाम शाळा,निगडी | साथी जी.ए.इनामदार स्पोटर्स अकादमी आकुर्डी |
| ५ | सावित्रिबाई फुले महिला व्यायामशाळा | क्रॉस फिट टेनिस सेंटर अकादमी निगडी |
| ६ | छ.शिवाजी महाराज जलतरण व्यायामशाळा | नवनाथ मित्र मंडळ आकुर्डी |
| ७ | कै.कैलास शंकरराव पांढारकर व्या.शाळा आकुर्डी | श्री.तुळजामाता महिला बचतगट आकुर्डी |

| | | |
|---|---|---|
| ८ | कै.संजय काळे हेल्थ क्लब,निगडी | संग्राम स्पोर्टस क्लब से.नं.२८ प्राधिकरण |
| ९ | स्वा.सावरकर व्यायामशाळा से.नं.२६ निगडी | कॅपस्टोन स्पोर्टस ऍन्ड फिटनेस से.२७ निगडी |
| १० | सुदर्शननगर महिला हेल्थ क्लब | श्रीधर नगर युवा प्रतिष्ठान चिंचवड |
| ११ | किवळे गावठाण व्यायामशाळा,किवळे | श्री.बापदेव महाराज सेवा संस्था मर्या.किवळे |
| १२ | गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्या.शा.राजर्षी शाहू उद्यान बिजलीनगर | शिवशक्ती महिला बचत गट शिवनगरी चिंचवड |
| १३ | श्री.गणेश व्या.शा.मरळ उद्यान पवनानगर | शंभुराजे मर्दानी खेळ विकास मंच चिंचवड गाव |
| १४ | कै.तानाजी गावडे व्या.शा.तानाजीनगर चिंचवड | अजीत स्वयंरोजगार सेवा सह.संस्था |
| १५ | राजमाता जिजाऊ महिला व्या.शाळा काकडे पार्क | काकडे पार्क मित्र मंडळ,चिंचवड |
| १६ | कै.बळवंत चिंचवडे व्यायामशाळा,चिंचवड | संस्कृती महिला बचतगट,चिंचवड गाव |
| १७ | डॉ.हेडगेवार क्रीडा संकुल व्या.शा.मासुळकर कॉ. | श्री.शिवाजी मित्र मंडळ,पिंपरी |
| १८ | खराळवाडी पुरुष व्यायामशाळा खराळवाडी | कामगार मित्र मंडळ पिंपरी |
| १९ | कै.आण्णासाहेब मगर तलाव व्या.शाळा पिंपरी | न्यु भारत विकास सोशल फाऊंडेशन नेहरुनगर |
| २० | श्री.भैरवनाथ व्यायामशाळा,भोसरी | छ.शिवाजी म.तरुण मंडळ भोसरी |
| २१ | कै.बाबुराव भांडे पिंपळे निलख व्या.शाळा | ओम साई फाऊंडेशन पिंपळे गुरव |
| २२ | शेवंताबाई साधु काशिद व्यायामशाळापिंपळे गुरव | स्वामी समर्थ विवेकानंद मित्र मंडळ |
| २३ | वैदुवस्ती व्यायामशाळा ,पिंपळे गुरव | वैदु समाज प्रबोधन मंडळ,पिंपळे गुरव |
| २४ | मुंजाबा चौक व्यायामशाळा,पिंपळे सौदागर | गणेश मित्र मंडळ पिंपळे सौदागर |
| २५ | सखुबाई गवळी उद्यान महिला व्या.शा.भोसरी | संस्कृती महिला स्वयं रोजगार संस्था,भोसरी |
| २६ | पै.शिवराम डोळस व्यायामशाळा,भोसरी | डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी |
| २७ | कै.कचदेव सिताराम लोंढे व्यायामशाळा भोसरी | लोंढे तालीम मित्र मंडळ भोसरी |
| २८ | कै.बिंदुमाधव ठाकरे व्या.शाळा यमुनानगर, निगडी | क्रांतीवीर मित्र मंडळ यमुनानगर |
| २९ | कै.मिनाताई ठाकरे महिला व्यायाम शाळा यमुनानगर | कुलस्वामीनी महासंघ यमुनानगर निगडी |
| ३० | कै.मधुकर पवळे व्या.शा.आणाभाऊ साठे क्रीडांगण यमुनानगर | हनुमान स्पोर्टस् अकॅडर्म,मोरेवस्ती चिखली |
| ३१ | सांगवी महिला व्यायामशाळा,सांगवी | मनोहरी महिला बचत गट सांगवी |
| ३२ | कै.मधुकर पवळे व्यायामशाळा, राजनगर | ओम साईराम सेवा प्रतिष्ठाण यमुनानगर |
| ३३ | कै.सदाशिव बहिरवाडे व्या.शाळा शाहुनगर | हनुमान स्पोर्टस् अकॅडमी मोरे वस्ती चिखली |
| ३४ | संत तुकारामनगर व्यायामशाळा वल्लभनगर | हनुमान स्पोर्टस् अकॅडमी मोरे वस्ती चिखली |
| ३५ | साई शारदा महिला व्या.शाळा आय टी आय कासारवाडी | अभिनव गगन स्पोर्टस् कासारवाडी |
| ३६ | फुगेवाडी व्यायामशाळा, फुगेवाडी | जय महाराष्ट्र मित्र मंडळ फुगेवाडी |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या ३६ व्यायामशाळांची मुदत संपुष्टात येत असल्याने संस्था, मंडळ, बचत गट यांनी मागणी केल्याप्रमाणे ३६ व्यायामशाळांना आदेशाच्या तारखेपासून ११ महिने कराराने दरमहा र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून सेवाशुल्क देऊन त्यांना चालविण्यास देणेस मान्यता देण्यास तसेच

| अ.क्र | व्यायामशाळेचे नाव | सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास घेणा-या संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | कै.सदाशिव बहिरवाडे व्यायाम शाळा, शाहूनगर | हनुमान स्पोटर्स अकॅडमी,मोरेवस्ती चिखली |
| २ | नव महाराष्ट्र व्यायाम शाळा,पिंपरी गाव | मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था,पिंपरी गाव पुणे |
| ३ | कै.दशरथ कापसे व्यायाम शाळा,पिंपरी गाव | मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरी गाव,पुणे |
| ४ | प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर,मोहननगर | अष्ट विनायक महिला प्रतिष्ठान, मोहननगर,चिंचवड,पुणे |
| ५ | उद्योगनगर महिला व्यायाम शाळा,चिंचवड | उद्योगनगर महिला विकास कैंद्र, चिंचवड,पुणे |
| ६ | पोलिस वसाहत व्यायामशाळा,कृष्णानगर,चिखली | कै.गजानन म्हेत्रे प्रतिष्ठान,म्हेत्रेवाडी चिखली |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या व्यायामशाळा या रकाना क्र.३ मध्ये नमूद केलेल्या संस्थाना ११ महिने कराराने म.न.पा कडून दरमहा र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) सेवाशुल्क देऊन कराराने चालविण्यास आदेशाचे तारखेपासून मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२२ विषय क्रमांक – ५६

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग - क्रीडा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१३६/२०२०, दि.११/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३ दि.११/१२/२०२० अन्वये मा.महापालिका आयुक्त यांनी प्रस्तावित केलेनुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/ २०१२ दि.०४/०७/२०१२ अन्वये, म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडू करिता खेळाडू दत्तक योजना राबविणे बाबतच्या धोरणास मान्यता दिली असून, सदर खेळाडू दत्तक योजना दि.०४/०७/२०१२ पासून राबविणे बाबत अंमलबजावणी करणेस मान्यता दिलेली आहे. खेळाडू दत्तक योजना २०१९-२० (आठवी बॅच) अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देऊन दि.१९/११/२०१९ ते दि.१९/१२/२०१९ या कालावधीत अर्ज मागविले असता एकूण ३३ अर्जापैकी म.न.पा क्रीडा धोरणानुसार ३० खेळाडू पात्र व ३ खेळाडू अपात्र करण्यास मान्यता दिली आहे. पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजनेचा २०१९-२० चा लाभ २ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.७५,१४,०००/- (अक्षरी र.रू.पंच्याहत्तर लाख चौदा हजार फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२३ विषय क्रमांक – ५७

दिनांक – १३/०१/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४ दि.११/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने सध्या निगडी, चिंचवड, संभाजीनगर, संत तुकारामनगर येथे संगीत अकादमी चालविल्या जातात. या संगीत अकादमी मध्ये शास्त्रीय गायन, सुगम गायन, तबलावादन, हार्मोनियम वादन इ.विषय शिकविले जातात.या संगीत अकादमी मध्ये प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई या अधिकृत संस्थेमार्फत परीक्षेस बसविले जातात. संगीत अकादमी सुरु झाल्यापासून अद्याप पर्यंत अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई यांच्या प्रारंभिक ते विशारद या परीक्षांमध्ये अंदाजे १५०० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा आता स्मार्ट सिटी मध्ये समावेश झाला असून महापालिकेकडून नागरिकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. शहरामध्ये सांस्कृतिक चळवळ निर्माण व्हावी तसेच नागरिकांचा सहभाग वाढविणे ही संकल्पना रुजण्यासाठी कला, संगीत अकादमीचे कामकाजाचा विस्तार करण्याची गरज निर्माण झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरात कला, संगीत अकादमीचे काम निरंतर चालवण्यासाठी मा.महेश काळे, प्रख्यात भारतीय शास्त्रीय गायक यांनी दिनांक १ डिसेंबर २०२० रोजीच्या ई-मेल द्वारे पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थी व उदयन्मुख कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणेसाठी महेश काळे स्कुल ऑफ म्युझिक व म.न.पा.च्या संयुक्त विद्यमाने संगीत अकादमी चालू करणे व सदर अकदमी हि इतरसांठी प्रेरणास्त्रोत ठरेल असे कळविले आहे.
सदर प्रस्तावात त्यांनी उल्लेख केलेल्या प्रमुख बाबी खालील प्रमाणे आहेत .

१) सद्याच्या प्रगत पिढीनूरुप अद्ययावत अभ्यास अंतर्भाव असलेला आभ्यासक्रम.

२) सध्याच्या पिढीनूसार व संगीत क्षेत्रात होणा-या विविध बदलास अनूसरुन राबविण्याची शैक्षणिक पद्धत.

३) अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापरकरुन शिक्षण देणे उदा. विविध संकेतस्थळावरील उपलब्ध असलेले ख्यातनाम कलाकारांचे माहितीपट

४) विद्यार्थ्यांना यु-ट्युब द्वारे नामांकित कलाकारांची, त्यांच्या घरण्यांची, रागांची माहिती उदा. नाट्यसंगीत, अभंग, ठुमरी, रबिंद्र संगीत इ. उपलब्ध होईल.

५) विद्यार्थ्यांचे WHATS APP ग्रुप तयार करुन त्यावर संगीत विषयक माहिती गोळा करुन ती इतर विद्यार्थ्यांबरोबर आदान – प्रदान करणे.

६) इंटरनेटवर मिळणा-या ध्वनिफित व लेख

७) संगीत क्षेत्रातील विशेषतज्ञ प्राध्यापकांना आमंत्रित करुन विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे.

८) संगीत कार्यशाळेचे आयोजन करणे.

९) संगीत मैफिल / महोत्सवाचे आयोजन करणे.

१०) साऊंड इंजिनिअरींगचे आजच्या संगीतामध्ये असलेला प्रभाव आणि महत्व

११) विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळणेकामी संगीत शिक्षकांच्या कामकाजाचे वेळोवेळी मुल्यमापन करणे.

१२) विद्यार्थ्यांच्या अडचणी व त्यांचे ध्येय प्राप्तीसाठी त्यांचे आभ्यासाचे मुल्यमापन व मार्गदर्शन

१३) विद्यार्थ्यांना अभ्याससाठी पोषक वातावरण तयार करणे.

१४) संगीत विद्यालयातील अंतर्भाव व्यवस्था उदा. स्वतंत्र रियाज कक्ष, तांत्रिक दृष्ट्या अद्ययावत संगीत वर्ग, ग्रंथालय, प्रेक्षागृह, ध्वनिमुद्रण कक्ष, उपहारगृह, कलाकारांची राहण्याची व्यवस्था, पर्यावरणपुरक वातावरण.

**संगीत अकादमीचे कामकाजाचे प्राथमिक स्वरुप**

१ (विद्यार्थ्यांसाठी नियमित संगीत वर्ग भरविणे.

२) शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

३) विद्यार्थ्यांची  सार्वजनिक कार्यक्रमाद्वारे वार्षिक प्रस्तुती

४) संगीत कार्यशाळा / आमंत्रित तज्ञांचे तासिका वर्ग

५) ग्रंथालय

६) संगीत विषयक जोड शिक्षण

७) संगीत महोत्सव व मैफल

८) साऊंड इंजिनिअरींग

९) शिष्यवृत्ती कार्यक्रम

१०) पर्यावरण संवर्धन

**प्राथमिक स्त्रोत**

सदर प्रकल्पाचे अंमलबजावणी करतेवेळी महापालिकेचे ९ संगीत शिक्षक व अस्तित्वात असलेल्या जागेचा वापर करता येईल. त्याच बरोबरीने संपूर्ण संगीत अकादमीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणेसाठी एका प्रशासकीय अधिका-याची व दोन जादा संगीत शिक्षकांची नियुक्ती करणे. तसेच सध्याची संगीत अकादमी जागेच्या दुरुस्तीसाठी र.रु.५.०० लक्ष ही खर्चाची मर्यादा राहील व टप्प्या-टप्प्याने अकादमीस योग्यत्या सुविधा म.न.पा. मार्फत निर्माण करणेत येतील. वरील बाबींच्या बरोबर प्रेक्षागृह, संगीत सभागृह, कार्यशाळेसाठी जागा व जाहिरातीसाठी आवश्यक स्त्रोत या सर्वांचा विचार वेळोवेळी करावा लागेल. सदर संगीत अकादमीत पहिल्या वर्षी ५०० विद्यार्थी, दुस-या वर्षी ७५० विद्यार्थी व तिस-या वर्षी १००० विद्यार्थी यांचा समावेश विचारात घेऊन प्रशासकीय व आवश्यक स्त्रोतांचे नियोजन करावे लागेल. तसेच मा. महेश काळे यांनी अतिरिक स्त्रोताबाबत प्रपत्र अ नुसार  व संगीत अकामदमी करीता म.न.पा.च्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत व म.न.पा. शाळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी र.रु.१०००/- अशी मासिक फी महेश काळे संगीत अकादमी आकारेल. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड संगीत अकादमी चालविणेस व याकामी येणा-या खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे व या बाबत योग्य तो करारनामा मा.आयुक्त यांनी करावा व अकादमी चालविणे बाबतचे पूर्ण अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड स्कूल ऑफ म्युझिक, निगडी कलादालन येथे सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यांची मागणी असली तरी सदरचा विषय दसरी दाखल करणेकामी मा.महापालिका सभेकडे

शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२४ विषय क्रमांक – ५८

दिनांक – १३/०१/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.६ दि.२४/१२/२०२० अन्वये नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध प्रकारचे कल्याणकारी योजना राबविले जातात. या विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. यासाठी महिला सक्षमी करणात अग्रेसर असलेला केरळ राज्यात “कुटुंब श्री” या प्रकल्पाला भेट देणे तसेच तेथील महिला सक्षमी करणाच्या कामकाजची पाहणी करणे यासाठी केरळ राज्यात माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये मा.महिला व बालकल्याण समिती सर्व सदस्या तसेच संबंधित अधिकारी यांचा अभ्यास दौरा आयोजित करणेकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२५ विषय क्रमांक – ५९

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग - वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१३/कावि/४८९/२०२०, दि.१६/१२/२०२०

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील आजी नगरसदस्यांच्या आरोग्य विमा योजना दि.१९/१२/२०२० पासुन १ वर्ष कालावधीकरीता लागू करणेबाबत.

विषय क्र.५९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ८०२६ विषय क्रमांक – ६०

दिनांक – १३/०१/२०२१ विभाग - ब क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/काविज/१२/१३६/२०२०, दि.३०/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची प्रस्तावात नमूद प्रमाणे कामे करणेच्या कामाबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका व क्रांतीवीर चापेकर स्मारक समिती च्या समवेत करावयाच्या करारनामा मसुदा मान्य करणे व सदर करारनाम्यास व याप्रमाणे करारनाम्यातील

तरतुदीनुसार कामाची निविदा रक्कम रु.५,७५,६४,०६६/- + GST ची रक्कम क्रांतिवीर चापेकर समितीस अदा करणेस व त्यापैकी निविदा र.रु.५,७५,६४,०६६/- रकमेच्या १५% र.रु.८६,३४,६१०/- (अक्षरी र.रू.शहाऐंशी लाख चौतीस हजार सहाशे दहा फक्त) इतकी रक्कम बँक गँरंटीपोटी क्रांतिवीर चापेकर समितीस आगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/६१/२०२१
दिनांक – १४/०१/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.उद्यान/२/कावि/३४६/२०२० दि.३०/१२/२०२० विषय क्र.२७ चे लगत)**

उद्याने देखभाल मुदतवाढ घेणेकामाचे मा.स्थायी समिती समोर सादर करावयाचे

**प्रपत्र 'अ'**

| अ.क्र | उद्यानाचे नांव | मुळ निविदा | पुर्वीच्या ठेकेदाराचे नांव | दरमहा र.रू. | मुळ आदेशाचा कालावधी | | आवश्यक मुदतवाढ कालावधी | सदर कालावधीत अदा करावयाची रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पासुन | पर्यंत | | |
| १ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, जगताप डेअरी (भाग १) | १०/२/२०१६-१७ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | १,०२,५७३/- | १४/८/२०१७ | १५/११/२०२० | १५/२/२०२१ पर्यंत ३ महिने | ३०७७१९/- |
| २ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, जगताप डेअरी (भाग २) | १/२/२०१८-१९ | मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन | ७७६९८/- | १६/८/२०२० | १५/११/२०२० | १५/२/२०२१ पर्यंत ३ महिने | २३३०९४/- |
| ३ | नाला पार्क उद्यान, से.नं. ७ व १० | १०/१/२०१६-१७ | मे.निसर्ग लँन्डस्केप सव्हिसेस | ४,०५,३५५/- | २१/८/२०१७ | १९/११/२०२० | १९/२/२०२१ पर्यंत ३ महिने | १२१६०६५/- |
| ४ | भोसरी सहल केंद्र | १०/२/२०१६-१७ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | ४,४६,५९४/- | २०/८/२०१७ | २०/११/२०२० | २०/२/२०२१ पर्यंत ३ महिने | १३३९७८२/- |
| ५ | दुर्गादेवी उद्यान | १५/२०१८-१९ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | ४,०५,३०२/- | ८/३/२०१९ | ७/११/२०२० | ७/२/२०२१ पर्यंत ३ महिने | १२१५९०६/- |
| ६ | मनपाचे विर सावरकर गणेश तलाव) | ८/१ /२०१७-१८ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | ३,१४,२७४/- | १६/१/२०१८ | ३०/११/२०२० | २८/२/२०२० पर्यंत ३ महिने | ९४२८२२/- |
| ७ | साईकृष्ण उद्यान | २/२०१८-१९ | मे.अथर्व स्वयं.औद्यो.सेवा सह संस्था | ७९७५०/- | २८/२/२०१९ | ३१/८/२०२० | ३१/१/२०२१ पर्यंत ५ महिने | ३,९८,७५०/- |
| ८ | पॉलीहाऊस प्रकल्प उद्यान | ७/१८/२०१८-१९ | मे.दिशा स्वयंरोजगार संस्था | ६६२५३/- | ३०/६/२०१८ | ३१/१२/२०२० | २८/२/२०२० पर्यंत २ महिने | १३२५०६/- |
| | | | | | | | | ५७,८६,६४४/- |

अति.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**(क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/१८३/२०२० दि.३०/१२/२०२० विषय क्र.३२ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य अ मुख्यालय
क्र.स्था/नि/अ-मुख्य/१८३/२०२०
दि. ३०/१२/२०२०

प्रपत्र अ ( १ ते४ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | मे.सिध्देश्वर एन्टरप्राईजेस | 92/16/2019-20 | प्रभाग क्र. १० मध्ये पेव्हिंग ब्लॉक,गटर्स,रस्ते दुभाजक,फुटपाथ व मनपा इमारतींची किरकोळ दुरुस्तींची कामे करणे. | ०५/१०/२०२० | स्था/नि/अ-मुख्य/१७७/२०२० | २९/१२/२०२० | २२,४९,९६७ | २२,२९,१०९ | ४,२५८ | १६,६०० | ३२.९९ % कमी | १५,१४,५८४ |
| २ | मे.शिलाबाई कंन्स्ट्रक्शन | 92/20/2019-20 | प्रभाग क्र. १५ मध्ये संडास ब्लॉक व मुता-यांची नुतनीकरण स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | १८/०९/२०२० | स्था/नि/अ-मुख्य/१५८/२०२० | २९/१०/२०२० | १७,९०,०९० | १७,५८,९४६ | ५,८९४ | २५,२५० | २८.१० % कमी | १२,९५,८२६ |
| ३ | मे.शिलाबाई कंन्स्ट्रक्शन | 92/23/2019-20 | प्रभाग क्र. १९ मध्ये संडास ब्लॉक व मुता-यांची नुतनीकरण स्वच्छ भारत अभियानाच्या | १९/०९/२०२० | स्था/नि/अ-मुख्य/१५७/२०२० | २९/१०/२०२० | २०,६८,४५९ | २०,३७,३१५ | ५,८९४ | २५,२५० | २८.२९ % कमी | १४,९२,१०३ |
| | मे.ए.आर.एन्टरप्राईजेस | 54/45/2019-20 | प्रभाग क्र. १९ मधील मुस्लीम दफनभुमीमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०९/०६/२०२० | स्था/नि/अ-मुख्य/१४३/२०२० | २२/१०/२०२० | २०,२४,१३८ | १९,६१,७२९ | ३७,१५८ | २५,२५० | २६.०१ % कमी | १५,१३,८९१ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८